**प्रेसनोट दिनांक १८/०८/२०१९**
**येरवडा पोलीस स्टेशन, पुणे**

**घरातून निघून गेलेल्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलाचा येरवडा पोलीस स्टेशनने शोध घेवून त्याचे आई वडीलांचे ताब्यात दिले.**

---

येरवडा पो.स्टे.गुन्हा रजि.नं. ५७८/२०१९ भा.दं.वि.क. ३६३यामधील अल्पवयीन मुलगा नामे-सुखविरसिंग कुलदिपसिंग पुंडीर,वय-१५ वर्षे,रा.मुस्लिम कब्रस्तान समोर स.नं. १४, जयजवाननगर, येरवडा, पुणे हा दि.१५/०८/२०१९ रोजी सायं. १९:०० वा.चे सुमारास राहते घरातून कोणास काहीएक न सांगता निघून गेला होता. त्यास कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी फुस लावून पळवून नेले बाबत त्याचे वडील कुलदिपसिंग कुंवर पुंडीर, वय ४३ वर्षे, रा. सदर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्ह्याचा तपास श्री. अजय वाघमारे, पो.निरी.(गुन्हे), अति.कार्यभार व.पो.निरी. येरवडा पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सचिन बनसवडे, येरवडा पो.स्टे. यांनी केला असून त्याचा मोबाईल नंबरचे कॉल डिटेल्सचे मदतीने कौशल्यपुर्वक तपास करून त्याचा कुर्ला, मुंबई येथे शोध घेवून तो कुर्लास्टेशन, मुंबई येथे मिळून आल्याने त्यास त्याचे आई वडीलांचे सुखरूप ताब्यात दिले आहे. पोलीसांचे तपासाबाबत त्याचे नातेवाईकांनी समाधान व्यक्त केले आहे. सदरची कार्यवाही श्री. अजय वाघमारे, पो.निरी.(गुन्हे), अति.कार्यभार व.पो.निरी. येरवडा पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील श्री. सचिन बनसवडे, पो.उप.निरी. श्री. प्रशांत किर्वे, पो.हवा. ८२६६ तेजस पवार, पो.शि. ८७५७ सागर कोतवाल अशा पथकाने केलेली आहे.

